MHNS030057012023

<u>नियमित फौजदारी प्रकरण क्र. ७२९/२०२३</u>
<u>निशाणी क्र. २६ वरील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मुळ फिर्यादी श्रीमती प्रतिक्षा प्रभाकर जुंदरे यांनी वाहन क्रमांक एमएच१५एचक्यु७९५८ हे विक्री करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. मुळ फिर्यादीचे थोडक्यात कथन असे आहे की, सदर वाहन हे तिला न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार मिळाले होते. सदर आदेशात वर नमुद वाहन विक्री करु नये अशी अट नमुद आहे. पंरतु दरम्यानच्या काळात दिनांक ३.११.२०२४ रोजी सदर वाहनाचा अपघात झाला आहे व वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. सदर वाहन दुरुस्ती करण्याकरिता साधारतः नउ लाख रुपयांचा खर्च आहे. अशा परिस्थीतीत फिर्यादी ही सदर वाहन दुरुस्त करु शकत नाही. आज रोजी सदर वाहन हे छत्रपती संभाजीनगर येथील कार शोरुम मध्ये उभे असुन सदर वाहन उभे करण्याचा रुपये पाचशे दर दिवसाचा खर्च शोरुम फिर्यादीला आकारात आहे. अशा परिस्थीतीत फिर्यादीने सदर वाहन विक्री करण्याची परवानगी मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. सरकार पक्षाने निशाणी क्र.२९ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. सरकार पक्षाने असे कथन केले आहे की, वर नमुद वाहन हे महत्वाचा पुरावा आहे. अशा परिस्थीतीत सदर वाहन विक्री करण्याची परवानगी फिर्यादीला देता येणार नाही.

३. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवादी ऐकला. या न्यायालयाने दिनांक १०.०५.२०२३ रोजी वर नमुद वाहनाचा अंतरिम ताबा फिर्यादीला दिलेला आहे. ज्यावेळेस फिर्यादीला वाहनाचा अंतरिम ताबा देण्यात आला होता त्यावेळेस सदर वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्याकरिता आरोपी क्र.३ सोनाली साहेबराव पवार हिने देखील अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज माझे पुर्वाधिकारी यांनी नामंजुर केला आहे. सदर आदेशाविरुध्द आरोपी क्र.३ ने मा.जिल्हा व सत्र न्यायालय यांच्या समक्ष रिव्हीजन

पिटीशन दाखल केले होते परंतु सदर पिटीशन देखील मा.जिल्हा व सत्र न्यायालय यांनी नामंजुर केले आहे.

**४.** प्रथम दर्शनी फिर्यादी ही वर नमुद वाहनाची मालक आहे हे सिध्द झाल्यामुळेच तिला वर नमुद वाहनाचा ताबा देण्यात आला होता. आज रोजी सदर वाहनाचे अपघात झालेला आहे. त्याबाबतची कागदपत्रे व छायाचीत्र फिर्यादीने निशाणी क्र.२८ सोबत दाखल केलेले आहे. वाहनाची छायाचीत्रे व वाळुंज पोलीस स्टेशन येथील अपघात अहवाल पाहीला असता असे दिसुन येते की, सदर वाहनाचा समोरील भागाचे तसेच संपुर्ण इंजिनचे नुकसान झालेले आहे. अशा परिस्थीतीत सदर वाहन विक्री करण्याची परवानगी फिर्यादीला देणे योग्य राहिल. आज रोजी सदर वाहन विक्री करण्याची परवानगी न दिल्यास सदर वाहन हे एकाच ठिकाणी उभे राहून आणखी खराब होण्याची शक्यता आहे व आज रोजी वाहनाची जी किंमत येत आहे ती भविष्यात मिळु शकत नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. परिच्छेद क्र.१ मध्ये नमुद केलेले वाहन विक्री करण्याची परवानगी मुळ फिर्यादीला देण्यात येते.

३. फिर्यादीने सदर वाहन विक्री करण्यापुर्वी रक्कम रुपये पाच लाखाचा सुर्पुदनामा न्यायालयासमक्ष दाखल करावा.

४. वाहन विक्री केल्यानंतर येणारी रक्कम ही या प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयास अधिन राहील.

KAMALJEET CHANDALIYA

Digitally signed by KAMALJEET CHANDALIYA
Date: 2026.01.30 17:12:06 +0530

**दिनांक: ३०.०१.२०२६.**

**(कमलजीत एम. चंडालिया)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नाशिक.**
**(कोर्ट क्र.३)**